# दूरशिक्षण केंद्राच्या परीक्षाही ऑनलाईन, ऑफलाईन

## विद्यापीठाकडून परीक्षा मार्गदर्शक तत्त्वे, सूचनांचे परिपत्रक जारी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ दूरशिक्षण अभ्यास केंद्राकडे प्रवेशित विद्यार्थ्यांची अंतिम वर्ष शेवटच्या सत्राची परीक्षा ऑनलाईन, ऑफलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे. तसेच अनुत्तीर्ण, अनुशेष विषयांची परीक्षा संबंधित महाविद्यालयामार्फत घेतल्या जातील.

विद्यापीठ उन्हाळी सत्र २०२० मधील अंतिम वर्षातील शेवटच्या सत्रातील सर्व अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांकरिता परीक्षा मार्गदर्शक तत्त्वे व सूचनांचे परिपत्रक परीक्षा विभागाने काढले आहे. अंतिम सत्राच्या अंतिम वर्षामधील विद्यार्थ्यांच्या अनुशेषित विषयांच्या बॅकलॉग परीक्षा १ ते ९ ऑक्टोबर दरम्यान होणार आहेत. नियमित विद्यार्थ्यांच्या परीक्षा १० ते



शिवाजी विद्यापीठातून...

२० ऑक्टोबर या कालावधीत होतील. अंतिम वर्ष अंतिम सत्राचे नियमित, पुनर्परीक्षार्थी, अनुशेषित विद्यार्थ्यांच्या सम सत्राच्या परीक्षा १३ मार्च २०२० पर्यंत पूर्ण झालेल्या अभ्यासक्रमावर होणार आहेत. अंतिम पूर्व वर्षाच्या, सत्राच्या पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या परीक्षा संपूर्ण शंभर टक्के अभ्यासक्रमावर होतील. अपरिहार्य कारणास्तव जे विद्यार्थी नियमित व बॅकलॉगची परीक्षा देऊ शकणार नाहीत. त्यांची परीक्षा, वेळापत्रक नंतर विद्यापीठाकडून जाहीर केले जाईल. ऑनलाईन परीक्षेत काही तांत्रिक कारणाने अडचण आल्यास तेवढाच कालावधी विद्यार्थ्यास सॉफ्टवेअरमध्ये वाढवून दिला जाणार आहे.

पी.जी.डिप्लोमा, डिप्लोमा सर्टिफिकेटच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा विद्यापीठ प्रणालीमधून घेण्यात येणार आहेत. अनुतीर्ण,अनुशेष विद्यार्थ्यांच्या परीक्षा संबंधित अधिविभाग, महाविद्यालयामार्फत घेतल्या जाणार आहेत. राज्यसेवा पूर्व परीक्षा व महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा ११ ऑक्टोबर रोजी आहेत. या दिवशी व राष्ट्रीय सुट्टीच्या दिवशी कोणत्याही परीक्षांचे आयोजन करण्यात येऊ नये, अशा सूचना परीक्षा व मूल्यमापन मंडळाने प्रभारी संचालक जी.आर.पळसे यांनी महाविद्यालय, अधिविभागांना काढलेल्या परिपत्रकात दिल्या आहेत.

### परीक्षा संदर्भातील सॉफ्टवेअरचे सादरीकरण

विद्यापीठाकडून अंतिम वर्षाच्या परीक्षेचे नियोजन सुरू झाले आहे. परीक्षेसंदर्भातील सॉफ्टवेअरचे बुधवारी केंद्र सरकारच्या कंपनीकडून सादरीकरण झाले. लवकरच सॉफ्टवेअरबाबतचा निर्णय घेतला जाणार आहे. परीक्षेच्या अनुषंगाने परीक्षा सुकाणू समिती व तांत्रिक समितीचे गठण करण्यात आले आहे, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

## शिवाजी विद्यापीठ : बहुपर्यायी प्रश्न, ऑनलाईन, ऑफलाईनचीही सुविधा

# अंतिम सत्राची परीक्षा १३ मार्चपर्यंत झालेल्या अभ्यासक्रमावर होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** अंतिम सत्राच्या नियमित, पुन:परीक्षार्थी, अनुशेषित (बॅकलॉग) विद्यार्थ्यांच्या परीक्षा दि. १३ मार्चपर्यंत पूर्ण झालेल्या अभ्यासक्रमावर होणार आहेत. या परीक्षेत बहुपर्यायी प्रश्न (एमसीक्यू) असतील.

ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने होणाऱ्या परीक्षांसाठी छायांकित प्रत आणि पुनर्मूल्यांकनाची सुविधा मिळणार नाही. त्याबाबतचा निर्णय शिवाजी विद्यापीठाने घेतला आहे. अंतिम पूर्व वर्ष अथवा सत्राच्या पुन:परीक्षार्थी विद्यार्थ्यांच्या परीक्षा या संपूर्ण १०० टक्के अभ्यासक्रमावर होणार आहेत. त्यांचे स्वरुपही एमसीक्यू असणार आहे. पी. जी. डिप्लोमा, डिप्लोमा सर्टिफिकेट पद्धतीच्या अंतिम वर्ष आणि सत्राच्या परीक्षा या विद्यापीठाच्या प्रणालीमधून घेण्यात येतील, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी बुधवारी दिली.

### विद्यार्थ्यांनी निकालाची खातरजमा करावी

विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षेचे परीक्षा अर्ज सादर केलेले आहेत, त्या सर्व विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष अथवा अंतिम सत्र वगळता निकाल जाहीर करण्यात येत आहेत. हे निकाल जाहीर करताना, विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने पारित केलेल्या निर्णयानुसार या कार्यवाहीबाबतचे अध्यादेश पारित करण्यात आले असल्याची माहिती पळसे यांनी दिली.

'चुकीच्या निकषाने पदवीचे हजारो विद्यार्थी अनुत्तीर्ण' हे वृत्त 'लोकमत'च्या मंगळवारच्या अंकात प्रसिद्ध झाले होते. त्यात प्रथम, द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांच्या जाहीर झालेल्या निकालीतील त्रुटी मांडल्या होत्या.

त्यावर परीक्षा व मूल्यमापन मंडळाने बुधवार खुलासा केला आहे. त्यामध्ये परीक्षा विभागाकडून राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार निकाल जाहीर केले आहेत. या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी आपले जाहीर झालेले निकाल तपासावेत. या संदर्भात अधिक माहिती आवश्यक असल्यास महाविद्यालय स्तरावर दाखवून त्याची खातरजमा करावी, असे म्हटले आहे.

## ओएमआर शीटचा वापर



परीक्षा देण्यासाठी जे विद्यार्थी ऑफलाईनचा पर्याय निवडतील, त्यांच्यासाठी ओएमआर शीटचा वापर करुन महाविद्यालय आणि शैक्षणिक संस्थांमध्ये परीक्षा घेण्यात येणार आहेत. ऑनलाईन परीक्षेत काही तांत्रिक कारणाने खंड पडल्यास तेवढाच कालावधी संबंधित विद्यार्थ्याला संगणक प्रणालीमार्फत आपोआप वाढवून दिला जाईल. यापूर्वी सोडविलेली उत्तरे ही आपोआप सेव्ह होऊन खंड पडला तेथून परीक्षा पुन्हा सुरु होईल.

# विद्यार्थ्यांना मिळाले वसतिगृहातील साहित्य

## शिवाजी विद्यापीठ : विद्यार्थी करणार घरी अभ्यास

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने वसतिगृहातील विद्यार्थ्यांना त्यांचे साहित्य परत देण्याची प्रक्रिया बुधवारपासून सुरु केली. पहिल्या दिवशी कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यांतील सुमारे १२५ विद्यार्थ्यांना साहित्य वितरित केले. शनिवार (दि. १९)पर्यंत ही प्रक्रिया चालणार आहे.

कोरोनामुळे विद्यापीठाच्या वसतिगृहातील सर्व विद्यार्थी हे आपापल्या गावी गेले होते. मात्र, त्यांनी वसतिगृहातील पुस्तके, नोट्स, आदी साहित्य नेले नव्हते. जिल्हा आपत्ती व्यवस्थापनाने विद्यापीठातील मुलांची आणि तंत्रज्ञान अधिविभागातील सर्व वसतिगृहे ही संस्थात्मक अलगीकरण आणि कोरोना रुग्णांच्या व्यवस्थेसाठी ताब्यात घेतली.

त्यामुळे विद्यापीठ प्रशासनाने या

> वसतिगृहातील एकूण ६५० विद्यार्थ्यांना त्यांचे साहित्य परत दिले जाणार आहे. ही प्रक्रिया शनिवार (दि. १९)पर्यंत चालणार आहे. ज्या विद्यार्थ्यांना या मुदतीत विद्यापीठात येणे शक्य होणार नाही, त्यांचे साहित्य एकत्रित ठेवण्यात येईल.
>
> – एस. डी. डेळेकर, मुख्य अधीक्षक, वसतिगृह

वसतिगृहातील काही खोल्यांमध्ये ठेवले होते. मात्र, आता अंतिम सत्राच्या परीक्षा होणार असल्याने आणि प्रथम, द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांचे ऑनलाईन शिक्षण सुरु झाले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना वसतिगृहातील साहित्याची आवश्यकता आहे. ते लक्षात घेऊन विद्यापीठ प्रशासनाने या विद्यार्थ्यांना साहित्य परत देण्यास सुरुवात केली आहे. कोरोनाच्या पार्श्वभूमीवर आवश्यक दक्षता घेऊन ही प्रक्रिया राबविण्यात येत

# पदवी अंतिम सत्रांच्या परीक्षेचे स्वरूप जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील पदवीच्या अंतिम सत्रांच्या परीक्षांचे वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर झाले आहे. नियमित अभ्यासक्रमाच्या परीक्षा १० ऑक्टोबर तर बॅकलॉगच्या परीक्षा १ ऑक्टोबरपासून ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने सुरु होणार आहेत. या परीक्षा बहुपर्यायी पद्धतीने घेण्यात येणार असून ५० गुणांसाठी एक तासाचा वेळ दिला जाणार आहे. नियमित परीक्षेसाठी ४५ हजार तर बॅकलॉगच्या ३० हजार असे एकूण ७५ हजार विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. यासंदर्भातील सविस्तर माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली.



परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना थेट महाविद्यालयात न बोलविता तंत्रज्ञानाच्या मदतीने परीक्षा घेण्याच्या सूचना अधिविभाग प्रमुख, प्राचार्यांना दिल्या आहेत. प्रात्यक्षिक परीक्षेसाठी skype अथवा Meeting apps या ॲपचा वापर करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. राष्ट्रीय सुट्टीच्या दिवशी कोणत्याही परीक्षेचे आयोजन करू नये. कोव्हिड-१९ या साथरोगाच्या प्रादुर्भावामुळे सर्व तरतुदी शैक्षणिक वर्ष २०१९-२० यासाठीच असणार आहेत.

# राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार निकाल जाहीर

## परीक्षा, मूल्यमापन मंडळ प्रभारी संचालकांचे परिपत्रक

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ परीक्षा विभागाकडून राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार निकाल जाहीर करण्यात आले आहेत. या अनुषंगाने विद्यार्थ्यांनी आपले जाहीर झालेले निकाल तपासावेत, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी पत्रकाद्वारे केले आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग व महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षेचे परीक्षा अर्ज सादर केले आहेत. त्या सर्व विद्यार्थ्यांचे अंतिम वर्ष, अंतिम सत्र वगळता निकाल जाहीर करण्यात येत आहेत. हे निकाल जाहीर करीत असताना विद्यापीठाच्या अधिकार मंडळाने पारित केलेल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आली आहे. निकालासंदर्भात अधिक माहितीसाठी महाविद्यालय स्तरावर दाखवून त्याची खातरजमा करावी, असे परीक्षा विभागाच्या परिपत्रकात म्हटले आहे.

# वसतिगृहातील साहित्याचे विद्यार्थ्यांना वाटप सुरू

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सोशल डिस्टन्सिगच्या नियमांचे पालन करीत शिवाजी विद्यापीठ वसतिगृहातील साहित्याचे बुधवारपासून विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ वसतिगृहात राहणारे विद्यार्थी मार्चमध्ये विद्यापीठ प्रशासनाने दिलेल्या सूचनेनुसार गावी गेले आहेत. कोरोना वाढत्या संसर्गाच्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनाने विद्यार्थी वसतिगृहामध्ये विलगीकरण केंद्र सुरू केली आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑक्टोबरमध्ये घेण्याचे नियोजन विद्यापीठाने सुरू केले.

बुधवारी सकाळी खासगी कर्मचाऱ्यांनी पीपीई किट घालून वसतिगृहातील साहित्य बाहेर काढले. वसतिगृह प्रशासनाने योग्य नियोजन व विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेत वसतिगृह क्र.१, २ व ३ पहिल्या मजल्यावरील विद्यार्थ्यांना त्यांचे साहित्य परत करण्यास सुरुवात केली. सांगली, सातारा, कोल्हापूरसह इतर जिल्ह्यातून आलेल्या विद्यार्थ्यांना ओळखपत्रासह इतर कागदपत्रे पाहून साहित्य देण्यात आले.